# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील दत्तक शाळा योजनेबाबत

**(१) १५० (२४-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.सचिन अहिर, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर, श्री.हेमंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक १८ सप्टेंबर,२०२३ रोजी दत्तक शाळा योजनेचा शासन निर्णय जाहीर केला असून त्यान्वये या योजनेंतर्गत अनेक शासनाच्या शाळांमधील पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी दत्तक शाळा योजनेंतर्गत जिल्हानिहाय किती शाळा या उद्योग समुह व स्वयंसेवी संस्थांनी दत्तक घेतल्या आहेत,

(३) असल्यास, जिल्हानिहाय या शाळांवरती पायाभूत सुविधा विकासासाठी उद्योग समुह व स्वयंसेवी संस्थांनी माहे डिसेंबर,२०२४ अखेर किती निधी खर्च केला आहे,

(४) असल्यास, उक्त दत्तक शाळा योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०७-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) या योजनेअंर्तगत उद्योग समूह अथवा स्वंयसेवी संस्थाकडून शाळा दत्तक घेण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत.

(४) CSR अंतर्गत विविध उद्योग समूहांकडून शालांसाठी पायाभूत सुविधा व अन्य सुविधांसाठी आर्थिक मदत तसेच शालोपयोगी साहित्य उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### शालेय स्तरावर कृषी अभ्यासक्रम समाविष्ट करणेबाबत

**(२) २४४ (२४-०४-२०२५) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे : दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक १९९२७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय स्तरावर कृषी अभ्यासक्रमाचा समावेश करण्यासाठी ज्येष्ठ कृषीतज्ज्ञ डॉ.राजाराम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली सन २००५ मध्ये तत्कालीन कृषी मंत्री महोदय व शालेय शिक्षण मंत्री महोदय यांना कृषी अभ्यासक्रम निश्चित करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीने सन २००६ मध्ये कृषी अभ्यासक्रम निश्चितीकरण अहवाल सादर केला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२४ च्या शैक्षणिक वर्षापासून कृषी विषयाचा समावेश शालेय शिक्षणात करण्याची घोषणा तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री यांनी सन २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली असून शालेय शिक्षणामध्ये कृषी विषयाच्या अध्यापनाचे कार्य कृषी पदवीधरांना देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इयत्ता १ ली ते १० वी, शालेय अभ्यासक्रमांत कृषी संबंधित विषयाचा टप्याटप्याने समावेश करण्यासंबंधी समिती व उपसमिती यांनी तयार केलेला मसुदा संबंधित इयत्ता आणि संबंधित विषयामध्ये घेण्याबाबतचा निर्णय अभ्यासक्रम समिती तथा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे स्तरावर अभ्यासक्रमाची पुनर्रचना होईल तेव्हा घेण्यात यावा असा अभिप्राय समितीमार्फत देण्यात आला असून त्यानुसार नवीन शैक्षणिक धोरणानुसार पुनर्रचित अभ्यासक्रमामध्ये कृषी विषयाचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कृषी विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केल्यास शेती उत्पादनातून राज्याची अर्थव्यवस्था बळकट करण्यासोबत आणि पूर्णवेळ शेती करणारे व शेतीपुरक व्यवसायात कार्यरत अशा ७० टक्के शेतकऱ्यांचे व जनतेचे जीवनमान सुधारण्याचे दृष्टीने महत्वाचा ठरणारा असून समितीने दिलेला अहवाल गत १७ वर्षापासून शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कृषी अभ्यासक्रम निश्चितीकरण समितीने शासनाकडे सादर केलेल्या कृषी विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याबाबत गत १७ वर्षापासून प्रलंबित अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, व त्याचे स्वरुप काय आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१), (२), (३), (४) व (५) शेती विषयाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करण्याबाबत मा.मंत्री (शालेय शिक्षण) व मा.मंत्री, (कृषी) यांची संयुक्त बैठक, दिनांक २५/०८/२०२१ रोजी पार पडली. सदर बैठकीत कृषी या विषयाचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी संयुक्तपणे अभ्यासक्रम तयार करावा असा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) व महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषद या संस्थांमधील तज्ञांची संयुक्त समिती गठीत करण्यात आली होती. तसेच, सदर समितीला सहाय्य व मार्गदर्शन करण्यासाठी कृषी महाविद्यालयातील १२ प्राध्यापकांची उपसमिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समिती, उपसमितीमार्फत शालेय अभ्यासक्रमात शेती विषयासंदर्भात समाविष्ट करावयाच्या घटक व उपघटकांवर इयत्तावार सखोल चर्चा करून दोन प्रकारचे मसुदे तयार करण्यात आले आहेत.
१. कृषी विषयाचे शालेय अभ्यासक्रमात एकात्मिक स्वरूपात समाविष्ट करावयाचे घटक.

२. कृषी विषयाचे शालेय अभ्यासक्रमात इयत्ता नववी आणि इयत्ता दहावीसाठी स्वतंत्र विषय म्हणून समावेश करावयाचे घटक.

समितीने त्यांच्या अहवालात सर्व घटक, उपघटकांचा समावेश करताना इयत्तानुसार सुसंगतपणा, विद्यार्थाचा वयोगट, काठिण्यपातळी यांचा सखोल विचार केला आहे.

नवीन शिक्षण धोरणानुसार पुनर्रचित अभ्यासक्रमामध्ये कृषी विषयाचा / आशयाचा समावेश करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम-२०२४ (वय वर्षे ३ ते ८) मध्ये कार्यशिक्षण विषयांतर्गत बालकाच्या कारक कौशल्या बरोबरच २१ व्या शतकातील महत्वपूर्ण कौशल्ये, तसेच कृषी, पर्यटन व्यावसायिकतेचा पाया याच पायाभूत स्तरापासून घातला जाईल अशा उपक्रमांची मांडणी केली आहे. भारतातील शेतीचे महत्व, कृषी क्षेत्रातील मानवी (मानवी संसाधने) गुंतवणूक, शेतीचे लोकजीवनातील विशेष स्थान या सर्व बाबी विचार करता नव्या पिढीची नाळ कृषी क्षेत्राशी जोडण्यासाठी कृषी क्षेत्राचा, कृषी तंत्रज्ञानाचा विस्तार होण्यासाठी माती, पाणी, नौसार्गिक संसाधने, वनस्पती, स्थानिक पशुपक्षी या विषयातील अनेक उपक्रम सुचविलेले आहेत. तसेच, इयत्ता ३ री ते १० वी या शालेय स्तरावर कृषी विषय एकात्मिक स्वरूपात समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण (२०२०) आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-शालेय शिक्षण (२०२३), राज्य अभ्यासक्रम आराखडा- शालेय शिक्षण २०२४ यांच्या मध्ये ‘व्यवसाय शिक्षणाची नवकल्पना मांडली आहे.

विद्यार्थ्यांना शेती विषयक, यंत्र आणि सामुग्री विषयक आणि मानवी सेवा या क्षेत्रातील प्रकल्प दर वर्षी करायचे आहे. त्यामुळे शेती सारख्या परंपरागत विषयात सुध्दा नवीन तंत्रज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना होईल व कृत्रिम बुध्दीमत्तेवर आधारित साधने कसे वापरायची यांचा सुध्दा समावेश केला आहे.

(६) प्रश्न उदभवत नाही.

---

## राज्यात सीएमश्री योजना राबविण्याबाबत

**(३) ३०० (२४-०४-२०२५) श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात “पीएमश्री” च्या धर्तीवर मा.मुख्यमंत्री यांच्या पुढाकाराने आता “सीएमश्री” योजना राबविण्यात येणार असल्याचे दिनांक ८ जानेवारी,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेमध्ये सीएमश्री योजनेसाठीही केवळ शासनाच्या शाळांचीच निवड केली जाणार असून या शाळांमध्ये बालवाटिका, स्मार्ट क्लासरुम, प्रशिक्षित शिक्षकांची व्यवस्था, पायाभूत सुविधा, व्यावसायिक शिक्षण आदी गोष्टींचा समावेश करण्यात येणार असल्याने यासंदर्भात कोणत्या शाळांचा समावेश करायचा त्याचे निकष व नियम तयार केले आहेत काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर योजनेमध्ये इतर शाळांचा समावेश करण्याबाबत शासन फेरविचार करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१८-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) केंद्र शासनाच्या "पीएम श्री" योजनेच्या धर्तीवर राज्यामध्ये "सीएम श्री" योजना राबविण्याचा शासनाचा मानस आहे. सदर योजना राज्यात राबविण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरात क्रीडा विभागातर्फे एक्सलन्स सेंटर सुरू करण्याबाबत

**(४) ३८५ (२४-०४-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खेळाडूंना ऑलिंपिकसह विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके मिळावीत, या उद्देशाने क्रीडा विभागाने 'मिशन लक्षवेध' अंतर्गत कोल्हापूरसाठी विभागीय स्तरावरील स्पोर्ट्स एक्सलन्स सेंटर अद्यापही सुरू केले नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळाडूंना पदके मिळावीत या उद्देशाने कोल्हापूर शहरातील एक्सलन्स सेंटर सुरू करण्याबाबत निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोल्हापूर शहरातील एक्सलन्स सेंटर सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०८-१०-२०२५) :** (१), (२) व (३) कोल्हापूर येथील स्पोर्टस सायन्स सेंटरचे दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी उद्घाटन झाले असून आधुनिक साहित्य व तज्ज्ञ प्रशिक्षक उपलब्ध करण्यात आले आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मिशन लक्ष्यवेध योजनेंतर्गत एकूण रुपये ८०००.०० लक्ष आर्थिक तरतूद करण्यात आलेली असून त्यापैकी रुपये ४८००.०० लक्ष निधी शासन निर्णय दिनांक २९सप्टेंबर २०२५ अन्वये वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या कृषी पदवी मान्यतेबाबत

**(५) ४५९ (२४-०४-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या दिनांक १४/६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार ज्या विद्यार्थ्यांनी सन २०१९ पूर्वी कृषी पदवी किंवा कृषी उद्यान विद्या पदवीसाठी प्रवेश घेतला आहे त्यांनाच मान्यता देण्यात आल्यामुळे सन २०२०, २०२१ तसेच २०२२ या वर्षी सदर पदवीकांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शासनाने सदर प्रकरणी माहिती घेऊन सदर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना पूर्ववत सीईटी/प्रबंध सादर करुन पदवीदान करण्याच्या निर्णयाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२९-०७-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.

कृषी अभ्यासक्रमांसंदर्भातील संवैधानिक संस्था किंवा नियामक मंडळांकडून झालेल्या पत्रव्यव्हारानुसार व चर्चेनुसार जुलै, २०१९ पासून सुरु होणाऱ्या शैक्षणिक सत्र २०१९-२० पासून कृषी पदवी अभ्यासक्रम मुक्त आणि दूरस्थ शिक्षण पध्दतीद्वारे शिकविण्यात येऊ नये असा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक २९/०१/२०१९ च्या बैठकीत घेतला व दिनांक १५ मार्च, २०१९ च्या सार्वजनिक सूचनेद्वारे सदर निर्णय सर्व भागधारकांना सूचित केला होता.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडून मुक्त व दुरस्थ शिक्षण पध्दतीद्वारे शिकविण्यात येत असलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांना (बी.एस्सी. (कृषी), बी.एस्सी. (फलोत्पादन) आणि एम.एस्सी. (कृषी विस्तार)) जुलै, २०१९ पासून सुरु होणाऱ्या शैक्षणिक सत्र २०१९-२० पासून प्रवेश देऊ नयेत असे विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठास दिनांक २०/०३/२०१९ च्या पत्रान्वये कळविले होते. सदर बाब विद्यापीठाच्या सर्व शिक्षणकेंद्रांना व विद्यार्थ्यांना कळविण्यात आली होती. जुलै, २०१९ मध्ये व तद्नंतर सर्व विद्यार्थ्यांना पुर्वकल्पनेद्वारे केवळ पदविका अभ्यासक्रमासाठीच प्रवेश देण्यात आला आहे. त्यामुळे त्यांचे भवितव्य धोक्यात आलेले नाही. १५ मार्च, २०१९ पूर्वी प्रवेशित विद्यार्थी पदवी पूर्ण करु शकत असल्यामुळे सदर विद्यार्थ्यांचे चौथे वर्ष पूर्ण झाल्यानंतर दिनांक १४/०६/२०२२ च्या परिपत्रकानुसार पदवीसाठी शेवटची CET विद्यापीठाकडून घेण्यात आली.

तरी, जुलै, २०१९ मध्ये व तद्नंतर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना CET/ प्रबंध सादर करुन पदवी अभ्यासक्रम करता यावा यासाठी विद्यापीठाने विद्यापीठ अनुदान आयोग, उच्च शिक्षण विभाग, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, यांच्याकडे मार्च, २०१९- जुन, २०१९ दरम्यान पाठपुरावा केला त्यानुसार सचिव, उच्च शिक्षण विभाग, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०/०६/२०१९ रोजी ३.०० वा. बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामधील चर्चेनुसार सदर अभ्यासक्रमांच्या संवैधानिक संस्था किंवा नियामक मंडळांच्या अभिप्रायाप्रमाणे कृषी संशोधन आणि शिक्षण संचालनालय आणि भारतीय कृषी संशोधन परिषदेने सन २०१६ पासून बी.एस्सी. (कृषी) अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून जाहीर करुन अभ्यासक्रमाचा दर्जा आणि निकष संरचित केले. त्यानुसार विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिके आणि स्वयंप्रशिक्षणावर मोठा भर आहे. देशातील ७४ कृषी विद्यापीठाकडून राबविण्यात येणारे पदवी / पदव्युत्तर / पीएच. डी. अभ्यासक्रम हे १०० टक्के निवासी अभ्यासक्रम आहेत. त्यामुळे मुक्त आणि दुरस्थ शिक्षण पध्दतीने शिकविताना बी. एस्सी. (कृषी) अभ्यासक्रमाचा दर्जा व निकष पूर्ण होत नाही.

याप्रकरणी विद्यापीठाने महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन राज्यपाल यांचेकडे दिनांक १५/०५/२०१९, तत्कालीन केंद्रीय कृषी मंत्री यांचे कडे दिनांक २९/०५/२०१९ आणि राज्याचे तत्कालीन कृषी मंत्री यांचेकडे दिनांक २४/०६/२०२० च्या पत्रान्वये पाठपुरावा केलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## अलमट्टी धरण्याची उंची वाढविल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यात पुरसदृश परिस्थिती निर्माण होण्याचा धोका असल्याबाबत

**(६) ५७६ (१७-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्नाटक शासनाच्या कृष्णाकाठ योजनेंतर्गत अलमट्टी धरणाची उंची पाच मीटरने वाढविण्यात येत असल्याने पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, सातारा यासह इतर जिल्ह्यातील पूरस्थिती गंभीर होण्याची भीती पूर अभ्यासकांनी व्यक्त केली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलमट्टी धरणाची पाणी पातळी सध्या ५१९.६० मीटर असतानाही पश्चिम महाराष्ट्राला महापुराचा धोका वाढत असल्याची भीती तज्ज्ञांनी व वडनेरे समितीने ही व्यक्त केली असून या धरणाची उंची ५२४.२६ मीटर पर्यंत वाढविल्यास पश्चिम महाराष्ट्रात कायम पूर परिस्थिती निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील महापूराला कारणीभूत ठरणाऱ्या अलमट्टी धरणाची ऊंची वाढविण्याचा निर्णय कर्नाटक शासनाने घेतला असून अलमट्टी धरणाच्या ऊंचीबाबतचा मुद्दा मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्याची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्य शासनाने अलमट्टी धरणाच्या उंची वाढीस स्थगिती मिळावी यादृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (११-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

डिसेंबर २०२४ मध्ये यासंदर्भात निवेदने प्राप्त झाली आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र शासनामार्फत भिमा व कृष्णा खोऱ्यात सन २०१९ मध्ये उद्भवलेल्या पूर परिस्थितीची कारणे शोधणे व भविष्यकालीन उपाययोजनेबाबत अभ्यास करण्यासाठी श्री.वडनेरे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. समितीने सादर केलेल्या अहवालानुसार अलमट्टी धरणाची उंची ५२४ मीटरपर्यंत गेल्यास अलमट्टी धरणातील पाण्याचा फुगवटा कर्नाटक हद्दीतच राहतो व २२१ किमीच्या पुढे जात नाही असे नमूद केले आहे. सदर अलमट्टी धरण हे महाराष्ट्र हद्दीपासून २३५ कि.मी. अंतरावर आहे. तसेच अलमट्टी धरणाच्या उंचीवाढीमुळे होणाऱ्या परिणामाबाबत अधिक ठोस निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी सखोल अभ्यास करण्याची आवश्यकता असलेचे समितीचे अध्यक्ष व तांत्रिक सदस्य यांनी स्वतंत्र पत्रान्वये कळविले आहे.

अलमट्टी धरणाच्या साठ्याचा (R.L. ५१९.६० व R.L.५२४.२५६) महाराष्ट्रावर होणाऱ्या परिणामाबाबत National Institute of Hydrology, Roorkee यांचेमार्फत अभ्यास करण्यात येत

असून, सदर अभ्यास अंतिम टप्प्यात आहे.
(३) होय, हे खरे आहे.
आंध्र प्रदेश शासनाने Special Leave Petition (Civil) No. १०४९८ of २०११ अन्वये सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे याचिका दाखल केली आहे. सदर याचिकेत अलमट्टी धरणाची उंची वाढीबाबत मुद्दा उपस्थित केला आहे.
(४) सदर याचिका मा.न्यायालयात सुनावणीसाठी प्रलंबित आहे.
(५) अलमट्टी धरणाच्या साठ्याचा (RL ५१९.६० व R.L. ५२४.२५६) महाराष्ट्रावर होणाऱ्या परिणामाबाबत National Institute of Hydrology, Roorkee यांचेमार्फत अभ्यास करण्यात येत असून, सदर अभ्यास अंतिम टप्प्यात आहे.
कर्नाटक शासनाच्या अलमट्टी धरणाच्या प्रस्तावित उंचीवाढीच्या निर्णयाच्या अनुषंगाने अलमट्टी धरणाची उंचीवाढ न करण्याबाबत मा.मुख्यमंत्री स्तरावर कर्नाटक शासनाकडे पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आरटीई अंतर्गत शुल्क प्रतिपूर्ती आणि स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क वितरणाबाबत

**(७) ६१७ (२४-०४-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.किरण सरनाईक, श्री.विक्रांत पाटील, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.एकनाथराव खडसे : दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक २३३१९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणावरील अधिकार, अधिनियम, २००९ मधील कलम १२ अंतर्गत लाभार्थी ठरलेल्या बालकांचे शिक्षणावर राज्याचा दरडोई होणारा खर्च जेवढा असेल तेवढी प्रतिपूर्ती त्यांच्या शाळांना देण्याची तरतूद सदर अधिनियमात केली असून, स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये शिक्षणाचा हक्क कायदा (आरटीई) द्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा शुल्क शाळांना वेळेवर मिळत नसल्याचे माहे जानेवारी,२०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, राज्याचा दरडोई होणारा खर्च किती आणि आरटीई अंतर्गत शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम किती आहे तसेच केंद्र शासन शुल्क प्रतिपूर्तीसाठी ६०% जबाबदारी स्विकारत असताना शासनाने दरडोई खर्चाइतकी शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम मंजूर न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये आरटीईच्या जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीसाठी शासनाने २०२४-२५ मध्ये १७३ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित केला असून त्यापैकी केवळ ४५ कोटी रुपये शासनाने आतापर्यंत देय केले असून आरटीई शुल्काची थकीत रक्कम २४०० कोटी रुपये असल्याने खाजगी शिक्षण संस्थाना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असून सदरील थकबाकी न मिळाल्यास येत्या शैक्षणिक वर्षात आरटीई कायदयातंर्गत प्रवेश देण्यात येणार

नसल्याची भुमिका खाजगी शाळा घेणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये आरटीईद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क शाळांना वितरीत करणेबाबत तसेच आरटीई कायद्यांअंतर्गत खाजगी शाळांची २४०० कोटी रुपये थकबाकी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०१-०८-२०२५) :** (१) व (२) आरटीई अंतर्गत इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी पर्यंतच्या एकूण विद्यार्थी संख्येच्या सुत्राप्रमाणे राज्य शासनामार्फत प्रतिपूर्तीचा दर निश्चित करण्यात येतो. त्यानुसार, प्रतिपूर्तीचा दर व शाळांनी त्या-त्या वर्षी ठरविलेले फी यापैकी जे कमी असेल त्यानुसार पात्र शाळांना केली जाते. आरटीई अंतर्गत संबंधित शाळांना प्रतिपूर्तीची रक्कम अगोदर राज्य शासनाकडून अदा केल्यानंतर केंद्र शासनाच्या वार्षिक कार्ययोजना व अंदाजपत्रक निर्मितीमध्ये केलेल्या मागणीच्या तरतुदीनुसार केंद्र शासनामार्फत राज्यास निधी उपलब्ध करून देण्यात येतो.
(३) व (४) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात आरटीई खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी रुपये ४६२.५६ कोटी इतका निधी शाळांना वितरीत करण्यात आलेला आहे. आरटीई २५ टक्के अंतर्गत राखीव जागावर प्रवेशित विद्यार्थ्याच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी सन २०२४-२५ पर्यंत रुपये १५७१.५३ कोटी निधी वितरित केलेला आहे. सद्य:स्थितीत संबंधित शाळांना प्रलंबित शुल्क प्रतिपूर्ती करण्यासाठी वित्त विभागाकडून निधी प्राप्त करून घेण्याकरीता पाठपुरावा करण्यात येत आहे.
आरटीई अंतर्गत शाळांना नोंदणी करणे बंधनकारक असून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची २५ टक्के प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची गळती रोखण्याबाबत

**(८) ७४९ (२४-०४-२०२५) श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागात माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण वाढत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राथमिक शाळांची दर्जा वाढ झाली आहे परंतु माध्यमिक शाळांची दर्जा वाढ झालेली दिसून येत नसल्याने माध्यमिक शाळांची दर्जा वाढ होण्यासाठी शासनाची भूमिका काय आहे,
(३) असल्यास, ग्रामीण भागात माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) विद्यार्थ्याच्या गुणवत्ता/दर्जा वाढीसाठी सर्व शाळांमध्ये गणित व भाषेची पायाभूत संकल्पनेची पोस्टर्स लावण्यासाठी देण्यात आलेले आहेत, इयत्ता पहिली ते बारावीच्या शिक्षकांना अध्ययन प्रक्रियेचे

व्यवस्थापन हे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे, तसेच, निपुण महाराष्ट्र हा शासन निर्णय दिनांक ०५ मार्च, २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला असून त्यानुसार जून, २०२५ पर्यंत विद्यार्थ्यांची भाषा व गणित विषयाच्या अनुषंगाने गुणवत्ता वाढ होण्यासाठी कृती कार्यक्रम देण्यात आलेला आहे, इत्यादी विविध उपाययोजना शासनामार्फत करण्यात येत आहेत.

(३) शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांचेस्तरावरून, शालेय शिक्षण विभागाबरोबरच इतर शासकीय विभागांच्या सहाकार्याने, वय वर्ष ३ ते १८ वयोगटातील अनियिमित, स्थलांतरित बालकांचे सर्वेक्षण करण्यात येते व त्या अंतर्गत आढळून येणारी बालके नजिकच्या नियमित शाळेत वयानुरूप दाखल करण्यात येतात.

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिकार अधिनियमानुसार ज्या वस्त्यांच्या नजिकच्या क्षेत्रामध्ये किंवा हद्दीच्या आत शाळा उपलब्ध नाहीत, अशा वस्त्यांमधील ६-१४ वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ मोफत वाहतूक/परिवहन सुविधा किंवा अन्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, अशी तरतूद आहे. तसेच, वस्ती नजीकच्या ५ कि.मी. एवढ्या अंतराच्या आत शाळा उपलब्ध नाहीत अशा वस्त्यांमधील माध्यमिक वर्गात शिक्षण घेत असणाऱ्या मुलांसाठी प्रति लाभार्थी रुपये ६००/- प्रमाणे एकूण १० महिन्यांकरीता रुपये ६०००/- केंद्र शासनाकडून प्रतिवर्षी मंजूर करण्यात येतात.

कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या योजनेअंतर्ग माध्यमिक स्तरातील मुलींसाठी निवासी शिक्षणाची व्यवस्था करण्यात येते.

गळती (ड्रॉपआऊट) झालेल्या विद्यार्थ्यांना शोधून काढणे/Track करणे सुकर होण्याच्यादृष्टीने, युडायस प्लस अंतर्गत Permanent Education Number (PEN) देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाथर्डी, (जि.अहिल्यानगर) येथे स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संगणकीकृत ग्रंथालय उभारणीसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(९) ८८० (२४-०४-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथर्डी, (जि.अहिल्यानगर) येथे स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सुसज्ज संगणकीकृत ग्रंथालय उभारुन सदर ग्रंथालयामध्ये इंटरनेट, डिजिटल साहित्य आणि विद्यार्थी सल्ला सेवा यासारख्या सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी विद्यार्थी व स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत दिनांक १३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाथर्डी, (जि.अहिल्यानगर) येथे स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सुसज्ज संगणकीकृत ग्रंथालय उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१२-०८-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

पाथर्डी, (जि.अहिल्यानगर) येथे सुसज्ज संगणकीकृत ग्रंथालय उभारणीसाठी विद्यार्थी व लोकप्रतिनिधींचे दिनांक १३/०१/२०२५ रोजी व त्यासुमारास पत्र प्राप्त नाही. तथापि, पाथर्डी (जि.अहिल्यानगर) येथे डिजीटल उपकेंद्र स्थापन करणे आणि या केंद्राचे बांधकाम व विकासासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निर्देशानुसार जिल्हा ग्रंथालय अधिकारी,अहिल्यानगर यांनी जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे दिनांक १८ ऑक्टोंबर, २०२३ रोजी मागणी केली होती.
(२) जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या आदेशान्वये डिजीटल उपकेंद्र पाथर्डी, (जि.अहिल्यानगर) या उपकेंद्रासाठी भूखंड मंजूर केला आहे. तसेच, सदर उपकेंद्रासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत रुपये ४,९९,११,५७६/- इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील स्त्री साक्षरता वाढविण्याबाबत

**(१०) ८८२ (२४-०४-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील साक्षरता दर ८२.३४% आहे, परंतु स्त्री आणि पुरुष साक्षरतेमध्ये १३% फरक असल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्त्री साक्षरता वाढविण्यासाठी तसेच, ग्रामीण आणि शहरी भागातील मुलींसाठी शैक्षणिक सुविधांच्या उपलब्धतेसाठी शासनामार्फत कोणत्या विशेष योजना राबविण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
राष्ट्रीय सांखिकी आयोग यांच्या सर्वेक्षण अहवालानुसार राज्यामध्ये स्त्री आणि पुरुष साक्षरतेमध्ये १३ ट्क्क्यांचा फरक आढळून आला आहे.
(२) स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी राज्यात केंद्र पुरस्कृत उल्लास-नवभारत साक्षरता अभियान राबविण्यात येत आहे. सन २०२२ ते २०२७ पर्यंत राज्यातील वय वर्ष १५ व त्यापुढील सर्व असाक्षरांना साक्षर करण्यासाठी योजना कार्यरत आहे.
ग्रामीण व शहरी भागात मुलींना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी १ ली ते १२ वी पर्यंत मुलींसाठी मोफत शिक्षण देण्यात येते.तसेच मुलींच्या शिक्षणासाठी विशेषत: कस्तुरबा गांधी बालीका विद्यालय स्थापन करण्यात आले आहेत. तसेच समग्र शिक्षा अभियाना अंतर्गत मोफत गणवेश, मोफत पाठ्यपुस्तक वाटप करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील क्रीडा संकुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(११) १३७१ (२४-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत : तारांकित प्रश्न क्रमांक २००७३ ला दिनांक ३ ऑगस्ट, २०२३ रोजी**

**दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील दोन हेक्टर शासकीय जमिनीवर साकारले जाणारे क्रीडा संकुलाचे काम मागील आठ वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर क्रीडा संकुलाचे काम अपूर्णावस्थेत असल्याने परिसरातील खेळाडू व क्रीडाप्रेमींनी नाराजी व्यक्त केल्याने क्रीडा संकुलाचे काम लवकरात लवकर सुरू करून खेळासाठी खुले करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०८-१०-२०२५) :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक ०२/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मौजे खर्डी तालुका शहापूर जि.ठाणे येथील स.नं.२६१/४/१ एकूण क्षेत्र १५-२६-५३ हेआर पैकी २-००-० हे आर ही जमीन शहापूर तालुका क्रीडा संकुल करीता वर्ग करण्यात आली आहे. त्यानुसार तालुका क्रीडा अधिकारी, शहापूर यांनी उपअधीक्षक भुमी अभिलेख, कार्यालय शहापूर यांना तालुका क्रीडा संकुलास प्राप्त जागेची मोजणी करण्यात येत आहे. तथापि, तालुका क्रीडा संकुलाच्या जागेवर अतिक्रमण टाळण्यासाठी व संकुल मैदान सुरक्षेच्या दृष्टीने संरक्षण भिंत बांधकामासाठी जिल्हा नियोजन समिती यांच्याकडे मागणी करण्यात आलेली आहे.

---

## राज्यात "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा अभियान" प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(१२) १८०७ (२४-०४-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शाळाबाहय मुलींचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी तसेच त्यांचे शिक्षण आणि विकासाच्या संदर्भात उपक्रम राबविण्यासाठी मागील सात वर्षांपासून "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा अभियान" राबविले जात असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ३ जानेवारी ते २६ जानेवारी या कालावधीदरम्यान "लेक शिकवा अभियान" राबविले जात असताना शालेय शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे सदरहू अभियान मागील काही वर्षांपासून प्रभावीपणे राबविले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शालेय शिक्षण विभागासह महिला विकास विभागानेही या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाकडे दुर्लक्ष केल्याचे शिक्षण विभागातील संचालक स्तरावरील अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले असल्याचेही त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले लेक शिकवा अभियान" प्रभावीपणे राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०१-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या महान शैक्षणिक कार्याची ओळख राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने दिनांक ०२/०१/२०१६ व दिनांक ३०/१२/२०१६ रोजीच्या शासन परिपत्रकांन्वये राज्यातील सर्व शाळांमधून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले लेक वाचवा लेक शिकवा अभियान राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२), (३), व (४) हे खरे नाही.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये, दिनांक ०३ जानेवारी २०२५ ते २६ जाने २०२५ या कालावधीत दिनांक ०२/०१/२०१६ व दिनांक ३०/१२/२०१६ रोजीच्या शासन परिपत्रकांमधील सूचनांच्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले लेक वाचवा लेक शिकवा अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली असून, त्याअंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती पुढीलप्रमाणे आहे : -

• क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली

• शाळेतील माजी कतृत्ववान विद्यार्थाचा सत्कार करणे शाळेच्या परिपाठात त्यांच्या प्रेरणादायी मुलाखती / मार्गदर्शन आयोजन करण्यात आले

• मुलांना पदवीधर होईपर्यंत शिक्षण न सोडण्याची प्रतिज्ञा देण्यात आली. मुलीच्या शिक्षणासाठी विशेष कार्य करण्याऱ्या महिला व्यक्तींचा सत्कार केला.

• आदर्शमातांना पुरस्कार वाटप केले.

• विद्यार्थी चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.

• मुलींसाठी मैदानी स्पर्धांचे आयोजन करण्यात आली व आरोग्य तपासणी करण्यात आली.

• प्रजासत्ताक दिनी विद्यार्थीनीचा सत्कार करण्यात आला, लोकगीते, सांस्कृतिक कार्यक्रम (क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनपटावर आधारीत) आयोजन करण्यात आले.

• लेक वाचवा लेक शिकवा आभियानातर्गत निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले.

• क्रातीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रभातफेरी, गीतगायन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, नाटीका सादरीकरण करण्यात आले, मातापालकांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

• गुड टच बॅड टच बाबत शाळास्तरावर मार्गदर्शन आयोजित केले.

• गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी गृहभेटी पालक भेटींचे आयोजन करण्यात आले.

• गावामध्ये मुलीच्या शिक्षणांबद्दल प्रभातफेरी काढून जनजागृती करण्यात आली.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पावसाचे वाया जाणारे पाणी साठविण्यासाठी विचारपरामर्श करण्यारिता समिती स्थापन करण्याबाबत

**(१३) १९४७ (१७-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाचे पाणी समुद्रात वाहून वाया जात असून, हे वाया जाणारे पाणी साठविण्यासाठी नवीन पर्यायाचा

विचार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्याकरीता एक समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असून भौगोलिक परिस्थितीमुळे गोडे, पिण्यायोग्य पाणी पश्चिमवाहिनी नद्यांमधुन समुद्रात वाहून जाते या कारणास्तव कोयना जलविद्युत, भंडारदरा प्रकल्प इत्यादी जलाशयांच्या उर्ध्व बाजूला असलेल्या गावांना देखील जलाशयातील पाणी पातळी कमी झाल्याने पाण्याची टंचाई जाणवत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पावसाळी हंगामात उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन करुन त्या त्या भागातील पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरीता बुडीत बंधारे किंवा बंधाऱ्यांची शृंखला किंवा बलून बंधारे बंधाऱ्यांची पर्यायाचा अवलंब करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (११-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

उजनी धरण, कोयना जलविद्युत प्रकल्प व भंडारदरा प्रकल्प यासारख्या राज्यातील धरणांच्या जलाशयाच्या वरील भागातील गावांमध्ये वर्षाच्या शेवटी व ऐन उन्हाळयांच्यावेळी पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. सदर गावांना जलाशयाच्या वरील भागात बुडीत बंधारे/बंधाऱ्यांची शृंखला बांधुन वर्षाच्या शेवटी व ऐन उन्हाळयांच्यावेळी पिण्याचे पाणी उपलब्ध करून देता येईल का? यानुषंगाने अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी जलसंपदा विभाग शासन निर्णय, क्रमांक. बैठक-२०१९/(३३०/२०२९)/लपा,दिनांक २२/०१/२०२५ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड येथील राज्य वखार महामंडळाच्या गोदामांच्या खाजगी वापराबाबत आणि व्यवस्थापनाबाबत

**(१४) २९८० (१८-०७-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड येथील मोहन नगर परिसरात राज्य वखार महामंडळातील गोदामाचा उपयोग खाजगी कंपनीच्या साहित्य साठवणीसाठी केला जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामंडळ परिसरात पाच गोदाम असून सर्व गोदामे औषध विक्री करणाऱ्या कंपन्यांना भाडेतत्त्वावर दिली आहेत, राज्य वखार महामंडळाचा फलक कार्यालयासमोर न लावता संरक्षण भिंती समोर लावला असल्याने नागरिकांना महामंडळाचे गोदाम शोधण्यात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने राज्यभरात कृषी आणि औद्योगिक क्षेत्रासाठी गोदामाचे जाळे निर्माण केले मात्र शहरी भागात शेतकऱ्यांची संख्या कमी होत असल्याने गोदामाचा उपयोग खाजगी वापरासाठी होत असल्याने सर्वत्र नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य वखार महामंडळाच्या सर्व गोदामाचा तात्काळ आढावा घेऊन सदर गोदामे शासकीय कामकाजासाठीच उपलब्ध करुन देण्याबाबत व पुरेसा कर्मचारीवृंद ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल (२५-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महामंडळाच्या चिंचवड वखार केंद्राच्या नावाचा फलक हा प्रवेशव्दारा जवळ दर्शनी भागात असून तो वखार केंद्राच्या आवारात आहे व रोड वरील येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना ठळकपणे दिसून येत आहे.
(३) हे खरे नाही, वखार महामंडळाकडे याबाबत कोणतीही तक्रार किंवा गोदामासाठी मागणी प्राप्त झाली नाही.
(४) वखार महामंडळाची गोदामे शेतकरी, शेतकरी संस्था, शासनाच्या विविध संस्था (FCI, NAFED, CCI, Election Commission) तसेच खाजगी ठेवीदार यांना साठवणूकीसाठी उपलब्ध करून देण्यात येतात. ज्या ठिकाणी शेतकरी व शासनाच्या संस्थाची गोदामांसाठी मागणी नसते त्या ठिकाणी महामंडळाचे नुकसान टाळणे तसेच वखार केंद्राचा आस्थापना खर्च भागवणे याकरीता खाजगी ठेवीदारांना गोदामे भाडेतत्वावर दिली जात आहेत. शेतकऱ्यांची मागणी असेल किंवा भारतीय खादय निगम सारख्या संस्थेचे आरक्षण असेल तर अशी गोदामे भाडेतत्वावर देण्यात येत नाहीत. खाजगी ठेवीदारांना गोदामे भाडेतत्वावर दिल्यावर दरपत्रकापेक्षा जास्त उत्पन्न मिळते. शासन मंजूरी (शासन निर्णय क्र.प्रनिमं१२२४/प्र.क्र.७०/सेवा-४ (का.१३-अ)) दिनांक १८ जुलै, २०२४ अन्वये पद भरती करीता मान्यता प्राप्त असून महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडे पदभरतीबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला असून कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या यशस्वी कामगिरीची पुनरावृत्ती करण्याबाबत

**(१५) ३३९० (१८-०७-२०२५) श्री.राजहंस सिंह, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शालेय शिक्षण विभागाचे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाला (एसएससी) केंद्रीय शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) दर्जाचे बनविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रातील एखाद्या मंडळासारखे बनण्यापेक्षा आठ वर्षांपूर्वी राज्यात स्थापन झालेल्या व त्यानंतर तीन वर्षात रद्द झालेल्या महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या यशस्वी कामगिरीची पुनरावृत्ती करण्याची मागणी शिक्षकांनी व सामान्य नागरिकांनी केली असून सीबीएसईचेच तत्त्व हे आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळास लागू होते त्या मंडळाची पुनर्स्थापना करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सीबीएसईचेच तत्त्व हे आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ मातृभाषेत लागू करुन आठ वर्षांपूर्वी राज्यात स्थापन झालेल्या व त्यानंतर तीन वर्षात रद्द झालेल्या महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०१-१०-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्याच्या शिक्षण विभागामार्फत जगातील विविध देशांच्या अभ्यासक्रमामधील सर्वोत्कृष्ट बाबींची निवड करून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाला (एसएससी) केंद्रीय शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) दर्जासारखे चांगले बनविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शालेय विद्यार्थ्यांना सायबर क्राईम व डिजिटल सुरक्षा यांचे मूलभूत शिक्षण देण्याबाबत

**(१६) ४३१५ (१८-०७-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायबर क्राईमच्या घटनांमध्ये गेल्या काही वर्षांत वाढ झाली असून सुशिक्षित नागरिक, वकील, डॉक्टर यांसारख्या व्यावसायिक व्यक्तीदेखील या फसवणुकीला बळी पडत असल्याने या पार्श्वभूमीवर शालेय विद्यार्थ्यांना सायबर क्राईम व डिजिटल सुरक्षा यांचे मूलभूत शिक्षण देणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळांमध्ये सायबर क्राईम जनजागृतीसाठी कोणत्या स्वयंसेवी संस्था, पोलीस विभाग किंवा तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सहकार्याने कार्यक्रम आयोजित केले गेले आहेत,

(३) असल्यास, शासनाने शालेय शिक्षण मंडळाशी समन्वय साधून सायबर सुरक्षा शिक्षण अनिवार्य करण्याचा विचार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाच्या ‘डिजिटल इंडिया’ मोहिमेच्या अंतर्गत शालेय सायबर सुरक्षा प्रशिक्षणासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदे, पुणे यांचेमार्फत दिनांक ३ नोव्हेंबर, २०२१ रोजी “सायबर जागरूकता दिवस” अंतर्गत सत्र आयोजित करण्यात आले. तसेच, Rotary Club of Poona- West तर्फे “Cyber Suraksha for Students” (English आणि Hindi) हे कार्यक्रम दिनांक ९ मे, २०२३ रोजी आयोजित करण्यात आले. वरील सर्व कार्यक्रम राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदे, पुणे यांच्या अधिकृत YouTube चॅनलवरून थेट प्रसारित करण्यात आले होते व ते अद्यापही उपलब्ध आहेत.

(३) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्यामार्फत इयत्ता ३ री ते १० वी पर्यंतच्या अभ्यासक्रमामध्ये सायबर सुरक्षा शिक्षणाचा समावेश करण्यात येत आहे. तसेच निवड व वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षण आदी सर्व प्रशिक्षणांमध्ये शिक्षणाचे ऑनलाइन स्रोत व सायबर सुरक्षा या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(४) परिषदेमार्फत राज्यातील शालेय शिक्षण स्तरावरील सर्व शिक्षक व शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांसाठी Canva संस्थेच्या मदतीने सायबर सुरक्षिततेवरील ऑनलाइन कोर्स विकसित करण्यात येत आहे. यासंदर्भातील आदेश देणे अंतिम टप्प्यात आहे. तसेच CIET, नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावर पालक, विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी सायबर सुरक्षिततेवर आधारित विविध मार्गदर्शक

साहित्य उपलब्ध करण्यात आलेले आहे, जसे की,
English Resources: • Be Safe in Cyber World (for Teachers)
• Be Safe in Cyber World (for Students)
• Basics of Cyber Safety & Security
• Safe Online Learning in Times of COVID-१९
• Cyber Safety & Security Guideline for Parents
• Cyber Safety and Security Guideline for School
• Handbook on Digital Safety (For Children)
• Pocket Book on Cyber Safety Tips
• Cyber Safety and Security Students Handbook
Hindi Resources: • कोविड-१९ के दौरान सुरक्षित तरीके से ऑनलाइन माध्यम द्वारा सीखना
• साइबर जगत में सुरक्षा (शिक्षकों के लिए)
• साइबर जगत में सुरक्षा (विद्यार्थियों के लिए)
• साइबर जगत में सुरक्षा (विद्यालयों के लिए दिशा-निर्देश)
• डिजिटल पेरेंटिंग (परवरिश)
• साइबर सुरक्षा के दिशा-निर्देश (अभिभावकों हेतु)
• साइबर सुरक्षा सुझावों पर एक पॉकेट बुक
Other Resources: • A Handbook for Adolescents/Students on Cyber Safety
• Cyber Safe Girl २.०
Weekly Tip Calendar: • Safe Internet Day (PDF)
• Safe Internet Day (Flipbook)
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नवीन शैक्षणिक धोरणानुसार दहावीऐवजी बारावीमध्ये बोर्ड परीक्षा होणार असल्याबाबत

**(१७) १७९८२ (२५-०३-२०२३) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नवीन शैक्षणिक धोरण २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षांपासून लागू होणार असून पदवी चार वर्षांची केल्यामुळे माध्यमिकचा शेवटचा वर्ग अकरावी ठरणार असल्याने या स्तरावर परीक्षा होणार असून बारावीस्तरावर बोर्डाची परीक्षा घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शैक्षणिक धोरणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व हे शैक्षणिक धोरण प्रत्यक्षात केव्हापासून अंमलात आणण्यात येणार आहे ?

**श्री.दादाजी भुसे (१९-०९-२०२५) :** (१) राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अंमलबजावणीबाबत निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय दिनांक १४/०७/२०२५ नुसार शालेय शिक्षणातील स्तररचना

देण्यात आलेली आहे, त्यानुसार माध्यमिक स्तर इ.९वी ते १२वी असा असणार आहे. त्यामुळे शेवटचा वर्ग इ.११वी नसून इ.१२वी असेल.राज्यमंडळाकडून इ.१०वी व इ.१२वी वर्गासाठीच्या वार्षिक परीक्षा घेतल्या जातात त्यामध्ये कोणताही बदल करण्याबाबत निर्णय शासनाने अद्याप घेतलेला नाही.

(२) दिनांक २४/०६/२०२२ च्या शासन निर्णयान्वये राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंमलबजावणीसाठी टास्क पूर्ण करण्यासाठी समिती गठित करण्यात आलेली असून त्यानुसार धोरणाची अंमलबजावणी राज्यात सुरु आहे.

राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंमलबजावणीसाठी शासनाने वेळोवेळी आदेश निर्गमित केलेले असून धोरण अंमलबजावणीचा एक भाग म्हूणन सन. २०२५-२६ पासून इ.१ली साठी नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात आलेला आहे.

---

## राज्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१८) २१५११ (०५-०१-२०२४) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक १९९०८ ला दिनांक २५ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बहुतांश शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२२-०९-२०२५) :** (१) व (२) शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ च्या आधारे पहिल्या टप्प्यात मुलाखतीसह व मुलाखतीशिवाय अशी एकूण २१,८३९ पदांची जाहीरात प्रसिध्द झाली. त्यानुसार १८,०३४ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. तसेच दूसऱ्या टप्प्यामध्ये सुमारे १०,००० शिक्षकीय पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये खंड पडू नये यास्तव शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ घेण्यात आली असून, त्याचा निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यामधील प्राप्त गुणांकनानुसार शिक्षक भरतीबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यास्तव रिक्त शिक्षक पदे भरणेबाबत शासन प्रयत्नशील आहे.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधास अंतरीम स्थगिती दिली असल्याने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन तसेच पदभरतीसंदर्भात कार्यवाही करता येत नव्हती नाही. त्यामुळे बरेच वर्ष शिक्षकेतर कर्मचारी यांची पदे भरली जात नव्हती. सदरची स्थगिती सद्य:स्थितीत उठलेली आहे. शिक्षकेतर कर्मचारी यांची पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शिक्षण सेवक पदातील अनुकंपा नियुक्तीत “टीईटी” ची जाचक अट रद्द करण्याबाबत

**(१९) २२०२१ (०५-०१-२०२४) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण सेवक पदातील अनुकंपा नियुक्तीत शिक्षण पात्रता परिक्षा (टीईटी) उत्तीर्ण असावे, अशी अट घालण्यात आली असून, शासनाच्या इतर कोणत्याही विभागातील अनुकंपा तत्वावरील नियुक्तीमध्ये अशी अट नसताना शिक्षण सेवकांबाबत असा निर्णय घेतल्यामुळे शिक्षक संघटनांनी तीव्र विरोध केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.न्यायालय, लोकायुक्त यांनी अनुकंपा तत्त्वावर मान्यता देण्याबाबत शासन निर्णय व आयुक्त, संचालक यांचे स्पष्ट आदेश असताना शिक्षण विभाग अनुकंपा तत्त्वावरील मान्यता देण्याबाबत विलंब करीत असल्याने अनुकंपा तत्वावरील उमेदवारांनी त्रुटीची पूर्तता केल्यानंतरही नवीन कागदपत्रांची मागणी केल्यामुळे मान्यता देण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, नाशिक, सोलापूर या आणि अन्य जिल्ह्यात आतापर्यंत किती प्रकरणांना मान्यता देण्यात आल्या आहेत व किती प्रकरणे प्रलंबित आहेत, तसेच शासनाने निर्णय घेवून शिक्षण सेवक पदातील अनुकंपा नियुक्तीतील अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२२-०९-२०२५) :** (१) दिनांक २०/०१/२०१६ च्या शासन निर्णयान्वये अनुकंपा तत्वावर नियुक्त शिक्षण सेवकांना शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याबाबत घेण्यात आलेला निर्णय राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने निश्चित केलेल्या अर्हतेशी विसंगत असल्याकारणाने दिनांक ०२/०९/२०२४ व दिनांक २३/०९/२०२४ च्या शासन आदेशान्वये अनुकंपा तत्वावर नियुक्त शिक्षकांना ५ वर्षात शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे व यापुढे अनुकंपा तत्वावरील नियुक्तीकरीता शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असल्याबाबतची तरतूद करण्यात आली आहे.

(२) व (३) अनुकंपा नियुक्तीचे प्रस्ताव पदभरती बंदी, आकृतिबंध अंतिम नसणे, अर्ज करण्यास विलंब होणे या कारणास्तव क्षेत्रिय स्तरावर अनुकंपा नियुक्तीस मान्यता देणेबाबतचे प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात येत असल्याबाबतचे निदर्शनास आले होते. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अनुकंपा तत्वावरील प्रस्ताव उक्त कारणास्तव प्रस्ताव प्रलंबित न ठेवता निकाली काढण्याबाबतच्या सूचना दिनांक १४/०९/२०२२ च्या शासन पत्रान्वये सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षकांना देण्यात येत असलेल्या अशैक्षणिक कामासाठी समिती स्थापन करण्याबाबत

**(२०) २२८७७ (०४-०४-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षकांना देण्यात येत असलेल्या अशैक्षणिक कामासाठी समिती स्थापन व्हावी, अशी मागणी "महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेने" शासनाकडे दिनांक १९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने एका समितीची स्थापना करण्यात येईल, अशी घोषणा मा.शिक्षणमंत्री महोदयांनी दिनांक ५ सप्टेंबर, २०२३ रोजी मुंबई येथे पार पडलेल्या 'राज्य शिक्षक पुरस्कार वितरण' कार्यक्रमात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने समिती गठित केली आहे काय, सदरहू समितीचे थोडक्यात स्वरूप आणि कार्यकक्षा काय आहे,
(४) असल्यास, सदरहू समितीचा अहवाल प्राप्त होण्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२९-०९-२०२५) :** (१), (२), (३) व (४) शिक्षकांना देण्यात येणाऱ्या अशैक्षणिक कामे देण्यात येऊ नयेत तसेच कोणती कामे शैक्षणिक आहेत व अशैक्षणिक आहेत, याबाबतची स्पष्टता यावी याकरीता दिनांक ०६/०९/२०२३ रोजी प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. समितीकडून प्राप्त अहवाल विचारात घेऊन दिनांक २३/०८/२०२४ रोजी शासन निर्णय देखील निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.